महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयातील “सहायक” हे पदनाम “वरिष्ठ लिपिक” या पदनामामध्ये रुपांतरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदसु-२०१४/प्र.क्र.१४०/आस्था-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना:-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग-बीएलसी-१०८०-११०७/वीस, दि.२८.११.१९८० अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्वतंत्ररित्या स्थापना करण्यात आलेली आहे. मंडळाचे विभाजन होताना या मंडळातील वरिष्ठ लिपिकाचे एकमेव पद विश्वकोश निर्मिती मंडळाकडे वर्ग झाले. त्यानंतर विश्वकोश निर्मिती मंडळाने सहायक हे एक पद निर्माण केले. त्यामुळे महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळासाठी सहायक व वरिष्ठ लिपिक ही दोन्ही पदे मंजूर आहेत. मात्र या दोन्ही पदांच्या वेतनश्रेणी तसेच कर्तव्य जबाबदाऱ्या समान आहेत. या दोन्ही मंडळामधील या पदांकरीता दि.६.६.१९७२ चे सेवाप्रवेश नियम अजून लागू आहेत. सदरहु सेवाप्रवेश नियम सुधारित करण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या सुरु आहे. त्यामुळे विश्वकोश निर्मिती मंडळातील “सहायक” व “वरिष्ठ लिपिक” ही समान वेतनश्रेणीतील व या पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान असल्याने “सहायक” या पदाचे पदनाम बदलून “वरिष्ठ लिपिक” असे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या कार्यालयातील -सहायक॰ व -वरिष्ठ लिपिक॰ या पदांची वेतनश्रेणी(वेतनबँड रू.५२००-२०२००/- व ग्रेड पे रू.२४००/-) व कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्यामुळे व सदर पदनाम बदलामुळे शासनावर कोणताही अतिरिक्त खर्च वाढणार नसल्याने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातील “सहायक” हे पद समकक्ष पे बँड मधील “वरिष्ठ लिपिक” या पदात रूपांतरित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे पद रूपांतरित केल्यामुळे सेवाप्रवेश नियमात त्याप्रमाणे सुधारणा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०५३/का.१२, दिनांक २१.०१.२०१५, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५९/२०१५/सेवा-९, दिनांक १.०४.२०१५ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१००/विसु-१, दिनांक १९.५.२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार तसेच,उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ९.११.२०१५ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१६०१०२१५१७१७८६३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dhaku Raghunath Chindarkar
Digitally signed by Dhaku Raghunath Chindarkar
Date: 2016.01.04 16:53:09 +05'30'

(धा.र.चिंदरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल-१, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
३. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
४. मराठी विश्वकोश कार्यालय, वाई, जिल्हा सातारा.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. (महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत)
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग, सेवा-९/ व्यय- ४/ वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई.
८. मराठी भाषा विभागातील सर्व कार्यासने.
९. निवड नस्ती.